महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १७

# महाराजा सयाजीराव आणि स्वतंत्र धर्म खाते

सुरक्षा घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १७

# महाराजा सयाजीराव आणि स्वतंत्र धर्म खाते

सुरक्षा घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
स्वतंत्र धर्म खाते
इतिहास
सुरक्षा घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - ३७
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सुरक्षा घोंगडे
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
४१६ ११४
मो. ७५०७३९९०७२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५२ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/**
**101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/**
**1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# आणि
# स्वतंत्र धर्म खाते

महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारतातील आज अखेरचे सर्वांत पुरोगामी राज्यकर्ते आहेत. इतकेच काय भारतीय धर्मसुधारणेच्या इतिहासात अगदी राजाराम मोहन रॉय यांच्यापासून ते नरेंद्र दाभोळकरांपर्यंतचे सगळे प्रयत्न सयाजीरावांच्या धर्मसुधारणेशी जोडून विचारात घेतले तर वरील विधानाची प्रचीती येईल. कारण ब्रिटिश आगमनानंतर मुख्यतः अमेरिकन आणि ब्रिटिश ख्रिश्चन धर्म प्रसारकांच्या धर्म प्रसार चळवळीतून हिंदू धर्म चिकित्सेला सुरुवात झाली. हिंदू धर्माचे सर्वांत मोठे चिकित्सक महात्मा फुले यांची हिंदू धर्म चिकित्सा हीसुद्धा अमेरिकन आणि स्कॉटिश यांच्या प्रेरणेने सुरू झाली होती. फुलेंच्या समोर यासंदर्भातील आदर्श मुख्यतः अमेरिकन आणि काही अंशी फ्रेंच मिशनरी होते, महत्त्वाचे म्हणजे ब्रिटिश नव्हते; परंतु भारतातील धर्म सुधारणेचा इतिहास विचारात घेता सुनियोजित पद्धतीने आणि दीर्घकालीन धोरण म्हणून धर्मसुधारणेचा कार्यक्रम आखणारे ब्रिटिश आगमनापासून आज

अखेरच्या २०० वर्षांच्या आधुनिक भारताच्या इतिहासातील सयाजीराव हे एकमेव राज्यकर्ते आहेत.

सयाजीरावांनी आपल्या ६२ वर्षांच्या राज्यकारभारात धर्मसुधारणेचे 'महासाक्षरता अभियान' अत्यंत शांतपणे आणि आपल्या राज्यकारभाराच्या मुख्य धोरणाचा भाग म्हणून अत्यंत रचनात्मक पद्धतीने राबविले. प्रबोधन, कृतिशीलता, कायदा अशा एकत्रित प्रयत्नातून महाराजांनी हे अभियान यशस्वी केले. येथे एक बाब नोंद घेण्यासारखी आहे ती अशी की, भारतातील धर्मसुधारणांचे प्रयत्न संख्येने अधिक असले तरी ते अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यापर्यंत जाण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. स्वतंत्र धर्म खाते सुरू करणारे सयाजीराव हे आधुनिक भारतातील पहिले प्रशासक आहेत. या पार्श्वभूमीवर आपण जेव्हा सयाजीरावांच्या धर्म खात्याची चर्चा करतो तेव्हा धर्म खाते सुरू करण्यागोदर आणि धर्म खाते सुरू झाल्यानंतर महाराजांच्या मृत्यूपर्यंत बडोद्यात झालेल्या सर्व धर्मसुधारणा जोडून विचारात घेणे अनिवार्य ठरते. सयाजीरावांनी बडोदा संस्थानात १९१७ ला स्वतंत्र धर्म खात्याची स्थापना केली असली तरी १८७७ पासूनच महाराजांनी संस्थानात धार्मिक सुधारणा करण्याच्या दिशेने सकारात्मक पावले उचलली होती. त्यामुळेच स्वतंत्र धर्म खात्याचा विचार करत असताना सयाजीरावांनी १८७७ पासून धर्म सुधारणेसाठी केलेले विविध प्रयत्न समजून घेणे अपरिहार्य ठरते.

## धार्मिक सुधारणा

१८७५ ला बडोदा गादीला दत्तक गेल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत १८७७ ला वयाच्या १४ व्या वर्षी सयाजीरावांनी धर्मसुधारणेच्या क्षेत्रात पाऊल टाकले. १८७७ मध्ये अहमदाबाद येथे अस्पृश्यांसोबत सहभोजन करून महाराजांनी आपल्या क्रांतिकार्याला सुरुवात केली. १८८१ मध्ये सयाजीरावांच्या हाती प्रत्यक्ष राज्यकारभारची सूत्रे सोपविण्यात आली. राज्यकारभार हाती आल्यानंतर दुसऱ्याच वर्षी म्हणजे १८८२ पासून महाराजांनी आपला धर्म साक्षरतेचा कृतिकार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. १८७५ ते १८८१ या सहा वर्षांच्या औपचारिक शिक्षणादरम्यान महाराजांमध्ये धर्माकडे बघण्याचा तटस्थ दृष्टिकोन निर्माण करण्यात इलियट सरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्या काळात नोकर लोकांमध्ये व्यसनाधीनता, बेशिस्त, मंत्र-तंत्र, अनुष्ठाने, अपशकुन यांचा अधिक प्रभाव होता. त्यावर प्रचंड खर्च होत असे. महाराजांनी आपल्या धोरणानुसार एकदम हुकूम काढून हे प्रकार बंद न करता हळूहळू लोकांची समजूत घालून हे सर्व कमी करण्यास सुरुवात केली. १८८२ मध्ये त्यांनी राजवाड्यातील खानगी कारभाराला शिस्त लावण्यास सुरुवात केली. यात मुख्यत: मिळकत, सामान खरेदी, देवघेवीचे व्यवहार यासारख्या बाबींचा समावेश होता. खानगी कारभारला शिस्त लावणे हा त्यांच्या धर्मसुधारणेतील पहिला टप्पा होता.

सयाजीरावांनी १५ फेब्रुवारी १८८२ मध्ये गणपतराव महाजन यांना खानगी कारभारी पदावरून हटवून त्यांच्या जागी रावजी विठ्ठल पुणेकर यांची नेमणूक केली; परंतु अपेक्षित सुधारणा न झाल्याने त्यांच्या जागी १८८४ ला जयसिंगराव आंग्रे यांना फलटण संस्थानच्या कारभारी पदावरून आणून आपल्याला अपेक्षित सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. पुढे २ वर्षांने आंग्रेच्या जागी महाराजांचे पहिले शिक्षक केशवराव पंडित यांची नेमणूक केली. यानंतर काही दिवसांनी त्यांच्या जागी दोराबजी पेस्तनजी या फारशी गृहस्थाची नेमणूक केली. खानगी कारभारी पदावर इतक्या कमी कलावधीत एवढ्या व्यक्तींच्या केलेल्या नेमणुकांवरून खानगी कारभाराला शिस्त लावण्यासाठी सयाजीरावांनी केलेल्या प्रयत्नांची कल्पना येते.

ज्या काळात परदेशप्रवास एक प्रकारे 'धर्मद्रोहच' मानला जात होता. त्या काळात (१८८४) सयाजीरावांनी आपले बंधू संपतराव गायकवाड व खासेराव जाधव यांना शिक्षणासाठी परदेशात पाठवले. त्यांच्याबरोबर संस्थानातील अधिकारी वासुदेव समर्थ आणि संपतरावांचे सासरे बापूसाहेब घाटगे यांनाही पाठवले. यादरम्यान बापूसाहेब घाटगेंचा परदेशातच मृत्यू झाला. त्यामुळे महाराजांच्या या निर्णयावर कुटुंबातून, शास्त्रीपंडितांकडून प्रचंड टीका झाली; परंतु याकडे दुर्लक्ष करून महाराजांनी शांतपणे आपल्या सुधारणांचा अंमल सुरू ठेवला. यानंतर महाराजांचा पहिला युरोप दौरा २९ मे १८८७ ते २१ फेब्रुवारी १८८८ या दरम्यान झाला.

महाराजांनी जेव्हा पहिल्या युरोप दौऱ्यावर जाण्याचे ठरवले तेव्हा त्यांचे नातेवाईक, नोकरचाकर त्यांच्याबरोबर जाण्यास तयार नव्हते. धर्मशास्त्रानुसार परदेशगमन निंद्य मानले जात असल्याने धर्मशास्त्राची प्रतिकूलता आणि परत आल्यानंतर स्वजातीत दाखल होण्यास अडचण अशी कारणे पुढे करण्यात आली. यावेळी महाराजांना त्यांच्याबरोबर परदेशात नेण्यास आवश्यक असणाऱ्या लोकांचे मन वळवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. त्याचप्रमाणे परदेशातून आल्यावर धर्माच्या संबंधाने येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी सरकारकडून मदत देण्याची हमी द्यावी लागली. अशा प्रतिकूल परिस्थितीतही महाराजांनी ही परदेशवारी करून आपला हेतू साध्य केला. परदेशातून परत आल्यानंतर मात्र महाराजांना आणि त्यांच्याबरोबर गेलेल्या सर्वांना प्रायश्चित्त घ्यावे लागले. परंतु याबाबत कोणतीही खळखळ न करता महाराजांनी शांतचित्ताने प्रायश्चित्त घेतले. या प्रायश्चित्तानंतर प्रायश्चित्ताबाबत धर्मशास्त्र काय म्हणते हे लोकांना कळावे आणि त्यातून लोकांची धर्माबाबत साक्षरता वाढावी म्हणून महाराजांनी भिकाचार्य ऐनापुरे यांच्याकडून १९०३ च्या हुकुमाद्वारे 'प्रायश्चित्तमयूख' हा संस्कृत ग्रंथ व त्याचे मराठी भाषांतर प्रकाशित केले. सयाजीरावांचे हे प्रायश्चित्त धर्माबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठीच्या प्रयत्नातील हा एक महत्त्वाचा टप्पा होता.

## अंधश्रद्धा निर्मूलक सयाजीराव

प्रत्येक सुधारणेची सुरुवात सयाजीराव ज्याप्रमाणे स्वत:पासून करत होते त्याचप्रमाणे धार्मिक सुधारणांची सुरुवातही त्यांनी राजवाड्यातील देवघरापासून केली. राजघराण्यातील धर्मभोळ्या व्यक्तींचा फायदा घेत काही बाबी साध्य करण्यासाठी ब्राह्मणांकडून राजघराण्यातील व्यक्तींना विविध प्रकारचे धार्मिक विधी करण्याचा आग्रह केला जात असे. बऱ्याचदा हे धार्मिक विधी अर्थहीन असत. मि. पेस्तनजी यांच्या सांगण्यावरून विनायकराव बहुलकर हे पुण्यातील विविध मंदिरांमध्ये बडोदा राजघराण्यातील व्यक्तींच्या नावाने धार्मिक विधी करत असत. बडोदा राजघराण्यात अशा विविध कर्मकांडांचे स्तोम माजले होते.

विविध ग्रहांच्या स्थितीचा राजघराण्यातील व्यक्तींच्या आयुष्यावर पडणारा वाईट परिणाम दूर करण्यासाठी केल्या जाणाऱ्या ग्रहांच्या शांतीचा विधीदेखील मोठ्या प्रमाणावर केला जात असे. याचबरोबर राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याची पद्धत अशाच कर्मकांडाचा एक भाग होती. राजघराण्यातील व्यक्तींचा सर्वसामान्य जनतेशी संपर्क आल्यानंतर किंवा एखाद्या विशेष प्रसंगानंतर दृष्ट लागून त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ नये म्हणून त्या व्यक्तीची दृष्ट काढली जात असे; परंतु अशी दृष्ट कोणत्या प्रसंगी, किती वेळा, कोणत्या व्यक्तीने काढावी या संदर्भात कोणतेही नियम निश्चित केलेले नव्हते. त्यामुळे

बडोद्यातील ब्राह्मण व्यक्तींकडून याचा गैरफायदा घेतला जाई. दक्षिणेच्या हव्यासापायी या ब्राह्मणांकडून राजघराण्यातील व्यक्तींची विनाकारण दृष्ट काढण्याचे प्रसंग वारंवार घडवून आणले जात असत. मुंग्याना साखर घालणे हादेखील अशाच प्रकारचा एक विधी होता.

सुरुवातीच्या काळात राजघराण्यातील व्यक्तींचा या विधींना असणारा पाठिंबा आणि प्रशासनातील अनागोंदी कारभार यामुळे सयाजीरावांना हे सर्व प्रकार शांतपणे सहन करावे लागत होते. या विधींसाठी लागणारा खर्च अगोदर मंजूर करून न घेता ऐनवेळी महाराजांकडून या खर्चास मान्यता मिळवण्याची सवय प्रशासनास लागली होती. अशावेळी हे विधी थांबवून महाराज कोणतीही चौकशी करू शकत नसल्याने या खर्चाला मान्यता देणे त्यांना भाग पडत असे. या परिस्थितीचा फायदा स्वार्थी पुजाऱ्यांकडून घेतला जात असे; परंतु एकदम अधिकाराच्या जोरावर कोणताही बदल न करता हळूहळू लोकांचे मतपरिवर्तन करण्यावर सयाजीरावांनी भर दिला.

सयाजीरावांनी राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक विधींचे अर्थ सर्वांना समजावेत यासाठी या विधींचे मंत्र अर्थासह प्रकाशित करण्याचा विचार केला. महाराजांनी त्यादृष्टीने २३ नोव्हेंबर १८८६ ला हु.हु.नं. ५० नुसार राजवाड्यात होणारी सर्व धार्मिक कृत्ये शास्त्रार्थासह तपशीलवार लिहून काढण्याचा आदेश दिला. त्याचबरोबर रा. रा. शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव

समर्थ आणि भाऊ मास्तर यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानुसार या तिघांनी धर्मविधींचा तपशीलवार शास्त्रार्थ विशद करणारा 'ऐनेराजमेहेल' नावाचा ग्रंथ तयार केला. या ग्रंथाविषयीची सयाजीरावांच्या मनातील आपुलकी आणि आदर विशद करताना सरदेसाई लिहितात, "हे पुस्तक म्हणजे महाराजांच्या नवीन प्रवृत्तीचा केवळ पाया होय. ऐनेराजमेहेलच्या अनेक आवृत्ती आजपर्यंत झाल्या आहेत आणि त्यांतील प्रकरणे पुन:पुन: चर्चा व विचार करून संपूर्ण करण्याकडे महाराजांनी इतके परिश्रम केले आहेत की, बहुधा दुसऱ्या कोणत्याही विषयावर ते केले नसतील." सर्वसामान्य जनतेतील धर्मविषयक ज्ञानाच्या प्रसारासाठीची सयाजीरावांची धडपड यातून अधोरेखित होते.

१८८६ चा महाराजांचा हा निर्णय म्हणजे भारतातील धर्मसाक्षरतेचा पहिला प्रयोग ठरतो. कारण राजाने आदेश काढला आणि समाज सुधारला असे होत नसते. कायदा आणि सत्ता हे जरी परिवर्तनासाठी आवश्यक असले तरी त्याबरोबर हजारो वर्षांच्या परंपरा अचानकपणे संपुष्टात येत नसतात. त्यामुळे सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे 'ऐनेराजमेहेल' या पुस्तकाच्या लेखनाच्या वेळी महाराजांनी कोणत्याही विषयावर केले नसतील एवढे कष्ट का केले होते हे स्पष्ट होते.

सर्वसामान्यांना धर्मविषयक ज्ञान उपलब्ध करून देण्याबरोबरच राजवाड्यातील धार्मिक खर्चाचा लेखाजोखाही सयाजीरावांनी त्यांच्यासमोर ठेवला. सयाजीरावांनी १८९२

मध्ये राजवाड्याच्या देवघरातील धार्मिक विधींच्या खर्चाचे १,००० पानांचे तपशीलवार बजेट छापून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. स्वत:च्या राजवाड्यातील खासगी धार्मिक विधींचा आर्थिक लेखाजोखा जनतेसमोर पुस्तकरूपाने मांडणारे सयाजीराव कदाचित एकमेव प्रशासक ठरावेत. या पुस्तकामुळे राजवाड्यातील धर्मविधी आणि त्यावर होणाऱ्या खर्चाची अचूक स्थिती सयाजीरावांच्या लक्षात येऊन पुढील धर्मविषयक सुधारणा त्यांना शक्य झाल्याचे निरीक्षण सयाजीरावांच्या खासगी वृत्तांतात सरदेसाईंनी नोंदविले आहे. यासंदर्भात सरदेसाईलिखित सयाजीरावांच्या खासगी वृत्तांतात वर्णन केलेली १८९७ मधील घटना उल्लेखनीय आहे. बडोद्याच्या महाराजांचे कापलेले केस नर्मदा नदीच्या प्रवाहात नेऊन टाकण्याचा रिवाज पूर्वापार चालत होता. त्यानुसार सयाजीरावांचे कापलेले केस नर्मदा नदीत टाकण्यासाठीचा खर्च म्हणून १ जून १८९७ रोजी खानगी कारभाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात ८८ रु. १२ आणे मंजूर केले; परंतु या संदर्भात मागण्यात आलेला इतर खर्च त्यांनी मंजूर केला नाही. सयाजीरावांनी धार्मिक खर्चाला लावलेल्या शिस्तीचे हे उदाहरण आहे

सयाजीरावांनी राजवाड्यात होणाऱ्या अनावश्यक धर्मविधींचे प्रमाण शक्यतो कोणाच्याही धार्मिक भावना न दुखावता कमी करण्यावर भर दिला. त्याप्रमाणे राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याची पद्धत बंद करण्यासंदर्भात २९ मे १९०१ ला

म्हणजेच आजपासून १२० वर्षांपूर्वी आदेश दिला. या हुकुमात सयाजीराव म्हणतात, “दृष्टी काढण्याचा रिवाज बंद करावा; परंतु देवभोळ्या समजुतीमुळे ही खास प्रसंगी कोणास दृष्ट काढल्याने सुख वाटत असल्यास तशी त्याच्या समजुतीस्तव काढण्यास हरकत नाही; मात्र होतकरू मुलांना देवभोळ्या समजुतीचा कित्ता होता होईतोंपर्यंत देऊ नये.” धर्मविधी बंद करत असताना समाजाची मानसिकता समजून घेण्याची सयाजीरावांची वृत्ती यातून अधोरेखित होते. लहान मुले धार्मिक बाबींच्या आहारी जाऊ नयेत यासाठी घेतलेली काळजी सयाजीरावांची सामान्य जनतेचा धार्मिक दृष्टिकोन निकोप होण्यासाठीची तळमळ स्पष्ट करते.

सयाजीरावांच्या शिक्षणादरम्यानच त्यांच्या शिक्षकांकडून याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. राज्याभिषेकाआधी सयाजीरावांना सर टी. माधवराव यांनी इतर शिक्षकांच्या साहाय्याने विविध विषयासंदर्भातील व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. २० जुलै १८८१ ला शिक्षण विषयावर देण्यात आलेल्या व्याख्यानात सयाजीरावांना “धर्मविषयक शिक्षण हे केवळ मानसिक पातळीवरील असावे. विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना कोणत्याही प्रकारच्या विशेष धार्मिक सूचना दिल्या जाऊ नयेत.” अशी सूचना करण्यात आली होती. दृष्ट काढण्यासंदर्भातील सयाजीरावांचा आदेश हा या सूचनेची अंमलबजावणीच आहे.

ग्रहणाच्या दिवशी सरकारी कार्यालयात घेण्यात येणारी सुटी हादेखील सरकारी पातळीवर पाळण्यात येणाऱ्या अंधश्रद्धेचाच भाग होता. प्रशासकीय व आर्थिक लाभ मिळविण्यासाठी ग्रहणाच्या दिवशी सरकारी कार्यालय बंद ठेवून धार्मिक विधी करण्याकडे कर्मचाऱ्यांचा कल असे; परंतु सयाजीरावांनी हुकूम काढून ग्रहणाची ही सुटी बंद केली. हा आदेश काढत असतानाच त्यांनी पाळलेली धार्मिक सहिष्णुता गोत्रीलिखित सयाजी चरित्रामध्ये अधोरेखित झाली आहे. गोत्री म्हणतात, "पृथ्वीची छाया चंद्रावर पडते त्यास 'ग्रहण' म्हणतात, हे सर्व सुशिक्षित लोकांना ठाऊक आहे; परंतु भोळे व भाविक लोक या दिवशी राहू किंवा केतू हे पापग्रह चंद्रास किंवा सूर्यास पीडा करतात, अशा समजुतीने तो दिवस धार्मिक कृत्यात किंवा बहुतेक निरुद्योगात घालवितात. ही त्यांची अज्ञान समजूत दूर व्हावी व त्यांना उद्योगाचे महत्त्व कळावे म्हणून बडोदे राज्यातील सरकारी कचेऱ्यात ग्रहणाच्या दिवशी रजा पाळीत असत, ती बंद करण्यात आली आहे व फक्त धार्मिक कारणानेच कोणास रजा पाहिजे असेल, तर त्याने रिपोर्ट करून रजा घावी, असे ठरविले आहे. यात लोकांच्या धार्मिक समजुतीसही महत्त्व दिल्याचे दिसून येते."

## सार्वजनिक दानधर्म संस्थांचे नियमन

राजवाड्यातील धर्मविधींना शिस्त लावत असतानाच या विधींवर होणारा अनाठायी खर्च कमी करणेदेखील अत्यावश्यक होते. ब्राह्मणास अन्नदान केल्यामुळे महत्पुण्य लाभते या हिंदू

धर्मातील समजुतीमुळे १७८२ पासून बडोद्याच्या राजवाड्यात दररोज ब्राह्मण भोजनाची प्रथा सुरू झाली. कालांतराने या भोजनासाठी येणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली. त्यामुळे १८०८ पासून या भोजनपंक्तीऐवजी महाराष्ट्रीयन ब्राह्मणांना २ भाग तांदूळ व १ भाग डाळ या प्रमाणात कोरड्या खिचडीचा शिधा देण्यास सुरुवात झाली.

सयाजीरावांचे दत्तक वडील खंडेराव महाराजांची इस्लाम धर्मावर विशेष श्रद्धा असल्यामुळे १८५८ मध्ये मुसलमान लोकांना भोजन देण्यासाठी ग्यारमीचा कारखाना सुरू करण्यात आला. यात दररोज येतील तितक्या मुस्लिम लोकांना भोजन देण्यात येई. ग्यारमी (मुसलमानी महिन्याचा ११ वा दिवस) व एकविसमी (मुसलमानी महिन्याचा २१ वा दिवस) दिवशी मुसलमानांना पुलाव व रोकड चिराखी (दक्षिणा) देण्यात येत असे. अन्नदान करत असताना व्यक्तीची गरज व उदरनिर्वाहाची अपरिहार्यता लक्षात घेतली जात नसल्यामुळे या भोजनाचा लाभ गरजूंबरोबर दरबारातील मानकरी लोकदेखील घेत. त्यामुळे महत्पुण्यासाठी केले जाणारे हे दान सत्पात्री होत नव्हते. १८७७-७८ मध्ये खिचडी व ग्यारमीवर ३,७१,६५२ रु. खर्च करण्यात आले होते. राज्याच्या उत्पन्नातील मोठा भाग या प्रथेवर विनाकारण खर्च होत होता.

राजवाड्यात चालत आलेल्या या अन्नदान प्रथेमध्ये सयाजीरावांनी बदल करत या प्रथेवर होणारा खर्च कमी केला. सयाजीरावांना त्यांच्या शिक्षकांकडून मिळालेले या संदर्भातील

मार्गदर्शन अभ्यासल्यास त्यांची भूमिका समजून घेणे सोपे जाते. २७ जुलै १८८१ ला सयाजीरावांना 'राजवाडा विभाग' या विषयावर दिलेल्या व्याख्यानात सर टी. माधवराव सांगतात, "धार्मिक कार्ये आणि दानधर्मावर होणारा खर्च जास्त आहे. त्यामुळे या खर्चात वाढ होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी. आवश्यक आणि शक्य असेल तेव्हा या खर्चाचे पुनर्समायोजन करण्यात यावे."

या शिकवणीनुसार समाजातील श्रीमंत व्यक्तींऐवजी केवळ गरजू व्यक्तींनाच खिचडी व ग्यारमीचा लाभ मिळावा यासाठी १८९३ मध्ये सयाजीरावांनी एक हुकूम काढला. जातीचा निकष न लावता सर्व जातीतील निराश्रित, अपंग, अंध, विधवा स्त्रिया, लहान मुले व गरजू व्यक्तींची समितीच्या माध्यमातून निवड करून त्यांना पास देण्यात यावेत आणि पासधारक व्यक्तीलाच खिचडी-ग्यारमी द्यावी असा हुकूम सयाजीरावांनी १६ जून १८९३ रोजी काढला. त्यामुळे ब्राह्मण आणि मुसलमान व्यक्तींबरोबरच इतर जातीतील गरजू व्यक्तींना देखील याचा लाभ मिळू लागला. १९०५-०६ मध्ये १,०४१ हिंदू व ८०८ मुसलमान व्यक्तींना हे पास देण्यात आले.

खिचडी-ग्यारमीप्रमाणेच श्रावण महिन्यात ब्राह्मण वर्गाला दिली जाणारी दक्षिणा ही देखील पूर्वापार चालत आलेली परंपरा होती. पेशवाईच्या काळात ब्राह्मणांकडून प्राचीन विद्या आणि संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी केल्या जाणाऱ्या कार्याचा

मोबदला म्हणून श्रावण महिन्यात त्यांना दक्षिणा देण्याची प्रथा सुरू झाली. पुढे हीच परंपरा बडोद्यात रुजली. याबरोबरच १८०२ मध्ये बडोद्यात विद्वान ब्राह्मणांना विशेष दक्षिणा देण्याची पद्धत सुरू झाली. तर १८०८ पासून संस्थानाबाहेरील ब्राह्मणांनादेखील दक्षिणा देण्यात येऊ लागली. मल्हारराव महाराजांच्या काळात श्रावणमास दक्षिणेवर होणाऱ्या खर्चात प्रचंड वाढ झाली. हीच स्थिती सयाजीरावांच्या सुरुवातीच्या काळात कायम होती. १८७७-७८ मध्ये श्रावणमास दक्षिणेवर १ लाखांहून अधिक रक्कम खर्च करण्यात आली.

तत्कालीन दिवाण सर टी. माधवराव यांना श्रावणमास दक्षिणेवर केला जाणारा हा अवाढव्य खर्च चिंतेची बाब वाटत होती. ७ जुलै १८८१ रोजी त्यांनी सयाजीरावांना 'राजवाडा विभाग' या विषयावर दिलेल्या व्याख्यानात ही चिंता व्यक्त केली आहे. या व्याख्यानात ते म्हणतात, "श्रावण दक्षिणा, बिदागी रमणा व इतर बाबींवर होणाऱ्या खर्चावरील नियंत्रण सुटले आहे. महाराजांनी या विषयात लक्ष घालून दानधर्मावर होणारा अवास्तव खर्च शिक्षणास प्रोत्साहन व दारिद्र्य निर्मूलनासारख्या योग्य कारणासाठीच होईल याची काळजी घ्यावी." या सुचनेबरहुकूम सयाजीरावांनी राज्याधिकार प्राप्तीनंतर हा अनावश्यक खर्च कमी करण्यास सुरुवात केली.

सयाजीरावांनी या खर्चाचा आढावा घेण्यासाठी १८९२ मध्ये एक समिती नेमली. या समितीमध्ये इंग्रजी शिकलेल्या पदवीधरांबरोबरच पारंपरिक शास्त्री पंडितांचाही समावेश करण्यात आला होता. या समितीच्या शिफारशीवरून दरवर्षी श्रावण महिन्यात विविध विषयांवर आधारित परीक्षा घेऊन ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच दक्षिणा देण्याचा नियम सयाजीरावांनी १८९४-९५ मध्ये केला. सुरुवातीच्या काळात एकदा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला ५ वर्षे दक्षिणा देण्यात येत होती. नंतरच्या काळात हा कालावधी कमी करून ३ वर्षे करण्यात आला. शेवटी दरवर्षी परीक्षा घेऊन त्यात उत्तीर्ण होणाऱ्या व्यक्तीलाच दक्षिणा देण्याचा सयाजीरावांनी आदेश दिला. या दक्षिणेची रक्कम ३० रुपयांपासून ते १५० रुपयांपर्यंत होती. या परीक्षेच्या माध्यमातून दरवर्षी आपले ज्ञान अद्ययावत करण्याची जबाबदारी ब्राह्मणांवर टाकण्यात आली. १८७७-७८ मध्ये श्रावणमास दक्षिणेवर झालेला १ लाख रुपयांहून अधिकचा खर्च या नियमाच्या अंमलबजावणीनंतर ५ हजार रुपयांवर आला. या श्रावणमास दक्षिणेतील बचतीपैकी प्रतिवर्षी ५,५०० रु. ची तरतूद नवीन ग्रंथांच्या लेखनासाठी करण्यात आली. पुढे सयाजीरावांनी या बचतीपैकी प्रतिवर्षी १०,००० रु. धर्मशास्त्रावरील उत्तम पुस्तके मराठीतून प्रसिद्ध करण्यासाठी खर्च करण्याचा आदेश दिला.

१८८१-८२ मध्ये धर्मादाय खर्चात मागील वर्षीपेक्षा ७८,१२१ रु. बचत झाली. १८८७-८८ मध्ये धर्मादाय खर्चात झालेली १,०५,९८९ रु. ची वाढ ही या २० वर्षांच्या कालखंडातील सर्वांत मोठी वाढ होती; परंतु ३ वर्षांच्या आतच १८९०-९१ मध्ये दानधर्मावरील खर्चात १,०८,०७९ रु. ची कपातदेखील करण्यात आली. तर १८९९-१९०० अखेर या खर्चात तिप्पट घट झाली. कोणताही बदल करत असताना हुकुमाच्या आधारे बदलाची अपेक्षा न करता सातत्यपूर्ण प्रयत्नातून अपेक्षित बदल साध्य करण्याची सयाजीरावांची हातोटी या प्रक्रियेत स्पष्ट होते.

## वेदोक्त : धार्मिक सुधारणेचा कार्यक्रम

आधुनिक काळातील गाजलेली दोन वेदोक्त प्रकरणे म्हणजे बडोदा आणि कोल्हापूर होय. बडोद्यातील वेदोक्त हे कोल्हापूरच्या अगोदर ४ वर्षे म्हणजेच १८९६ मध्ये घडले. महाराजांनी १८८४ पासूनच धर्म सुधारणेचा कार्यक्रम सुरू केला होता. १८९२ पासून १८९६ पर्यंत सयाजीरावांनी यासंदर्भातील आपला अभ्यास पक्का केला असल्याने बडोद्यातील हे वेदोक्त प्रकरण कोल्हापूरच्या वेदोक्ताइतके चिघळले नाही.

पहिल्या महाराणी चिमणाबाई यांच्या भगिनी नेपाळमध्ये दिल्या होत्या. नेपाळमधील मंडळी आणि महाराज यांच्या एकत्र भोजनाच्या एका प्रसंगी त्या मंडळींनी महाराजांना आपल्या पंगतीस घेण्यास नकार दिला. ही घटना वेदोक्ताचा विचार महाराजांच्या मनात येण्यामध्ये कारणीभूत ठरलेली पहिली घटना होती. त्यानंतर २१ ऑगस्ट १८९१ ला महाराज जोधपूरला

गेले असता शिवदत्त नावाचे मारवाडी जोशी महाराजांना भेटले. ते वारंवार बडोद्याला येत. राजवाड्याच्या देवघरातील पुराणोक्त पद्धतीने होणाऱ्या धर्मविधी पाहून त्यांना आश्चर्य वाटत असे. त्यांनी महाराजांना रजपुतांमधील वेदोक्त विधीप्रमाणे बडोद्यात धार्मिक विधी का होत नाहीत याचा शोध घेऊन हे विधी वेदोक्त पद्धतीने सुरू करावेत असे अनेक वर्षे लेखी अर्ज देऊन सुचविले होते. समक्ष भेटूनही ते याबद्दल महाराजांना सांगत असे.

जोधपूर येथे रजपुतांचे विधी प्रत्यक्ष पाहिल्यानंतर बडोद्यातही वेदोक्त पद्धतीने विधी सुरू करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला. यासंदर्भात महाराजांनी राजारामशास्त्री टोपले या संस्कृत पाठशाळेतील विद्वान शास्त्रीशी चर्चा केली. महाराजांशी बोलताना ही मंडळी त्यांचे क्षत्रियत्व आणि वेदोक्त यांची बाजू घेत. पण प्रत्यक्ष कृतीच्या वेळी मात्र माघार घेत. यावर उपाय म्हणून महाराजांनी २८ डिसेंबर १८९५ रोजी आप्पासाहेब मोहिते यांची नायब खानगी कारभारी म्हणून नेमणूक केली. हीच वेदोक्त प्रकरणाची सुरुवात होती. या सर्व प्रकरणात मोहितेंबरोबर धामणस्करांसारखी मंडळीही होती. बडोद्यातील ब्राह्मणांनी महाराजांविरुद्ध प्रचार सुरू केला, त्यांच्यावर बहिष्कार टाकला. परंतु महाराजांची पूर्वतयारी पक्की असल्यामुळे त्यांनी मे १८९६ मध्ये 'पुढील दसऱ्यापासून राजवाड्यातील कृत्ये वेदोक्त पद्धतीने करावी' असा हुकूम दिला. १५ ऑक्टोबरपासून या हुकुमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मोहितेंनी पार पाडली.

महाराजांनी वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने सरदेसाईंचा कसा उपयोग करून घेतला ही हकीकत मनोरंजक आहे. सरदेसाई म्हणतात, “महाराजांनी आपल्या धर्मकृत्यांत क्षत्रियांचे विधी वेदोक्त मंत्रांनी करण्याचा परिपाठ घातला; पूर्वीच्या उपाध्ये मंडळींना नोकरींतून कमी करून वेदमंत्रांनी कर्मे करणारे नवीन उपाध्ये नेमिले. ह्या कामी महाराजांचे हुकूम बरोबर पाळले जातात की नाही, पूजा, श्रावणी इत्यादी प्रसंगांत जे मंत्र म्हटले जातात ते वेदांतले की बाहेरचे हे तपासण्याचे काम त्यांनी मला सांगितले. त्यासाठी सर्व सोळा संस्कारांच्या विधींचे मराठी भाषांतर करून छापण्याचे काम मी केले.”

मे १८९६ ला महाराजांनी १५ ऑक्टोबर १८९६ पासून वेदोक्त विधी करण्याचा आदेश दिला असला तरी हा विधी करण्यासाठी एकही महाराष्ट्रीयन ब्राह्मण तयार झाला नाही. त्यामुळे वाड्यातील संबंधित सर्व ब्राह्मणांना नोकरीतून काढून, त्यांचे उत्पन्नही जप्त करण्यात आले. महाराष्ट्रीयन ब्राह्मणांनी नकार दिल्याने १५ ऑक्टोबरचा राजवाड्यावरील दसऱ्याचा विधी शिवदत्त मारवाडी जोशी, रेवाशंकर व भोलानाथ या तीन गुजराती ब्राह्मणांनी सुरू केला. राजवाड्यातील ब्राह्मण भोजनास महाराष्ट्रीयन ब्राह्मणच असत; परंतु वेदोक्ताचा परिणाम म्हणून या ब्राह्मणांनी राजवाड्यावरील भोजनावर बहिष्कार टाकला. सयाजीरावांनी याला पर्याय म्हणून महाराष्ट्रीयन ब्राह्मणांऐवजी या भोजनात गुजराती ब्राह्मण किंवा इतर जातीचे किंवा कोणत्याही

जातीचे अनाथ, अपंग जेवले तर त्यापासून मिळणारे पुण्य आणि समाधान जास्त आहे अशी भूमिका घेतली. कालांतराने वेदोक्ताचा विषय बडोद्यातून कायमचा हद्दपार झाला.

२८ मार्च १८९८ ला उमरठ येथे युवराज फत्तेसिंहराव, जयसिंहराव, शिवाजीराव या राजपुत्रांबरोबर भाऊसाहेब गायकवाड व त्यांचे बंधू पिलाजीराव आणि मे. विश्वासराव घाडगे यांचे उपनयन विधी वेदोक्त पद्धतीने केले. या विधीवर २३,२९९ रु. खर्च झाला. या मुंजींच्या स्मरणार्थ सयाजीरावांनी उमरठ येथे मारुतीचे मंदिर बांधण्यासाठी १०,००० रुपये मंजूर केले. पुढे १६ मार्च १९०५ ला राजपुत्र धैर्यशीलराव आणि इतर सात मुलांची मुंज लक्ष्मीविलास राजवाड्यात झाली. महाराजांनी या प्रकरणाच्या निमित्ताने धर्माच्या नावाखाली चालू असलेल्या फसवणुकीबाबत लोकांना विचार करण्यास भाग पाडले. त्याचबरोबर काही धर्मविषयक ग्रंथांची निर्मितीही केली. एकंदर धर्मसुधारणेसाठी हे वेदोक्त प्रकरण उपयुक्त ठरले.

## सर्व जातींना धार्मिक शिक्षण

सयाजीरावांनी १८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर लगेचच आपल्या सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या कार्यक्रमास सुरुवात केली. याच कालखंडात महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारणांच्या प्रयत्नास सुरुवात झाली होती. पुण्यामध्ये महात्मा फुले, गंगारामभाऊ म्हस्के यांसारखे सत्यशोधकी सुधारणा घडवत होते. मामा परमानंद यांच्या शिफारशीवरून १८८४

मध्ये सत्यशोधकी विचारांचे रामचंद्र विठोबा धामणस्कर यांना ब्रिटिश सरकारच्या नोकरीतून बोलावून घेऊन सयाजीरावांनी बडोद्यात नायब सुभे या पदावर नेमले. तेव्हापासूनच बडोद्यात सत्यशोधकी विचारांना चालना मिळाली. धामणस्करांचा जातीविषयक प्रश्नांचा उत्तम अभ्यास होता. पुढे १९०१ मध्ये धामणस्कर बडोद्याचे दिवाण बनले. रामजी संतूजी आवटे या आणखी एका सत्यशोधकी विचारांच्या व्यक्तीने 'बडोदा वत्सल' हे सत्यशोधकी वर्तमानपत्र काढून बडोद्यातील सामाजिक प्रश्नांची चर्चा चालू ठेवली.

ब्राह्मणेतरांना त्यांच्या धार्मिक कार्याची जाणीव होण्यासाठी रामजी संतूजी आवटे आणि धामणस्कर यांनी मिळून १८९६ मध्ये बडोद्यात माधवराव पवार यांच्या घरी मराठा जातीचे पुजारी तयार करण्याचा वर्ग सुरू केला. या पुरोहित पाठशाळांच्या माध्यमातून धर्मप्रचारक नेमून धर्मातील मुलत्वाचा प्रसार करण्याचे कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले. या पाठशाळेत धार्मिक साक्षरतेचे शिक्षण दिले जात होते. त्याचबरोबर भगवद्गीतेचे ज्ञानदेखील देण्यात येत होते. पुढे २३ वर्षांनी याच धर्तीवर १९१९ मध्ये कोल्हापूर येथे श्री शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना सत्यशोधक भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली केली.

ज्या काळात अस्पृश्यांना शिक्षण घेण्यास मनाई होती त्या काळात ब्राह्मणेतर जातींना विशेषत: अस्पृश्य जातींना संस्कृत शिक्षण देण्याची दृष्टी महाराजांनी दाखवली. हा फारच

ऐतिहासिक आणि क्रांतिकारक निर्णय आहे. गुजरातमधील अंत्यज आपापली धार्मिक गृहकृत्ये आपल्याच जातीतील पुरोहिताकडून करून घेत. या पुरोहितांना गरोडा म्हणत. अस्पृश्य जातींच्या या पुजाऱ्यांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी ऑगस्ट १९१३ मध्ये गरोडा पाठशाळेची सुरुवात करण्यात आली. पहिल्याच वर्षी या शाळेत १० अस्पृश्य विद्यार्थी संस्कृत शिक्षण घेत होते. त्यांना दरमहा प्रत्येकी ८ रु. शिष्यवृत्ती देण्यात आली. या पाठशाळेच्या अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षांचा होता.

या पुरोहित प्रशिक्षण शाळेच्या माध्यमातून ब्राम्हणेतरांमध्ये धार्मिक विषयांचे ज्ञान प्रसारित करण्याचा सयाजीरावांचा उद्देश होता. १९१७ साली या शाळेला भेट दिल्यानंतर सयाजीरावांनी शाळेसाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचे आदेश दिले. कडी प्रांतातील अस्पृश्य लोकांमध्ये धर्मोपदेश देण्यासाठी १९२४ पासून यतवेश्वर महादेव मंदिराकडून धर्मोपदेशक नेमले जात होते. त्यांना वर्षाला १२० रु. मानधन दिले गेले. आधुनिक कालखंडात भारतातील सयाजीराव हे पहिले राज्यकर्ते आहेत की ज्यांनी अस्पृश्यांना संस्कृत ज्ञानभांडाराची दारे १९१३ मध्ये खुली केली.

सयाजीरावांनी हिंदू धर्मातील सर्व जातींना संस्कृत शिक्षण देण्याच्या हेतूने संस्कृत पाठशाळा अमुक एका वर्गासाठी नसून हिंदूतील सर्व जातीसाठी आहे, असा हुकूम काढला. या हुकूमात सयाजीराव म्हणतात, ‘बडोद्यात संस्कृत पाठशाला या नावाची संस्था काढण्यात आली आहे आणि तत्प्रीत्यर्थ पुष्कळ

खर्च करण्यात येत आहे. या संस्थेवर चांगली देखरेख ठेवून विद्यार्थ्यांना तीत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा लाभ चांगल्या प्रकारे मिळू शकेल अशी काळजी ठेविली पाहिजे. या संस्थेचा लाभ अमुक एका जातीलाच न मिळता हिंदूतील सर्व जातींना मिळाला पाहिजे आणि या उद्देशाने हल्ली दिल्या जात नसलेल्या जातींना पाच-पाच रुपयांच्या दहा शिष्यवृत्या ठेवून त्या अशा इतर जातींच्या विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. या योजनेचा उद्देश ब्राह्मणवर्गाला हानिकारक नसून त्याला लाभकारकच आहे.'

सयाजीरावांनी आपल्या कारकिर्दीत भारताच्या शेकडो वर्षांत ज्या सुधारणा होऊ शकल्या नाहीत त्या सुधारणा अनेक क्रांतिकारक निर्णयांच्या माध्यमातून केल्या. असाच एक निर्णय म्हणजे हिंदू धर्मातील सर्व जातींना संस्थानी खर्चाने संस्कृत शिकवण्याची केलेली सोय होय. सयाजीरावांनी वेदाभ्यास हा सर्व जातींचा अधिकार आहे ही भूमिका घेत अस्पृश्य व ब्राम्हणेतरांसाठी संस्कृत पाठशाळा सुरू केली. ७ मार्च १९१५ रोजी बडोद्यात संस्कृत पाठशाळेची स्थापना करण्यात आली. या संस्कृत पाठशाळेत धर्मांच्या तौलनिक अभ्यासासाठी संस्कृतबरोबरच इंग्रजीचे शिक्षण देण्याचीदेखील व्यवस्था करण्यात आली होती. या पाठशाळेत हिंदू धर्मातील सर्व जातींना प्रवेश देण्याबरोबरच ज्या जातींना संस्कृत ज्ञानाचा लाभ मिळत

नव्हता त्या सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ रु.च्या दहा शिष्यवृत्त्या दिल्या जात होत्या. सामाजिक बदलास आवश्यक 'पूर्वतयारी' करण्याबाबतची सयाजीरावांची तत्परता यातून अधोरेखित होते.

## इंदिराराजेंचा आंतरजमातीय विवाह

महाराष्ट्राला शाहू महाराजांच्या प्रेरणेने शाहू महाराजांच्या जनक घराण्यातील चुलतबहिणीचा इंदूरच्या होळकरांबरोबर १९२४ मध्ये झालेला मराठा-धनगर हा आंतरजातीय विवाह माहीत आहे; परंतु शाहू महाराजांना या आंतरजातीय विवाहाची प्रेरणा देणारा त्याअगोदर ११ वर्षे १९१३ ला झालेला राजघराण्यातील पहिला मराठा-आदिवासी आंतरजमातीय विवाह महाराष्ट्राला माहीत नाही. असा विवाह सयाजीराव महाराजांची कन्या इंदिराराजे यांनी कूचबिहार या आदिवासी संस्थानातील राजकुमार जितेंद्र नारायण यांच्याशी स्वत:च ठरवून केला होता. विशेष म्हणजे सयाजीरावांनी ग्वाल्हेरच्या माधवराव शिंदे यांच्याशी त्यांचा विवाह ठरवला होता. असे असतानाही सयाजीराव या विवाहात स्वत:ची प्रतिष्ठा आडवी न येऊ देता खंबीरपणे मुलीच्या पाठीशी उभे राहिले.

सयाजीरावांच्या मुलीने केलेला हा विवाहसुद्धा सयाजीरावांनी आपल्या राज्यात केलेल्या धर्मसुधारणा उपक्रमाशी जोडून विचारात घ्यावा लागतो. कारण इंदिराराजेंचे हे बंड फक्त सयाजीरावांच्या निर्णयाविरुद्धचे बंड एवढ्या वैयक्तिक

पातळीवर घेऊन चालणार नाही. कारण हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विवाह हा एक महत्त्वाचा धर्मसंस्कार आहे. हिंदू धर्मशास्त्र जाती अंतर्गत विवाहालाच मान्यता देते. इंदिराराजेंचा हा विवाह विचारात घेता तो जातीची चौकट मोडणारा होताच; परंतु त्यापुढे जाऊन तो आदिवासी-मराठा असा आंतरजमातीय विवाह होता. महाराजांनी या विवाहला मान्यता देऊन आपल्या सुधारणा कार्याला एकप्रकारे कृतिशीलतेची जोड दिली असेच म्हणावे लागेल.

## स्वतंत्र धर्म खाते

सयाजीरावांनी एप्रिल १९१७ मध्ये बडोदा संस्थानातील धर्मसुधारणेसाठी स्वतंत्र धर्म खात्याची सुरुवात केली. या विभागाचे प्रमुख म्हणून जगदीशचंद्र चटर्जी यांना धर्माधिकारी या पदावर नेमण्यात आले. त्याचवेळी जमनादास गंगाराम मेहता यांची धर्माधिकाऱ्यांचे प्रमुख सहायक म्हणून नेमणूक करण्यात आली. धर्म खात्याची सुरुवात करताना सयाजीरावांनी या खात्याला विशिष्ट जबाबदारी निश्चित करून दिली होती. त्यानुसार धर्म खात्याला देवस्थान विभाग, संस्कृत पाठशाळा, पुरोहित वर्ग, धार्मिक शिक्षणाची जबाबदारी देण्यात आली. त्याचबरोबर सार्वजनिक दानधर्म संस्थांचे नियमन, संस्कृत, पुरातत्त्वशाखीय व प्राच्यविद्याविषयक संशोधन, प्राचीन हस्तलिखितांचे संकलन, गायकवाड ओरिएंटल सिरीजचे प्रकाशन याचीदेखील

जबाबदारी सयाजीरावांनी धर्म खात्यावर सोपवली. १९१७ पासूनच धर्म खात्याच्या वतीने प्राचीन भारतीय संस्कृती आणि तुलनात्मक धर्म या विषयांवर सार्वजनिक व्याख्यानांचे आयोजन करण्यात येऊ लागले.

धर्म खात्याच्या स्थापनेनंतर धर्म अधिकाऱ्याच्या नावे राखीव व साधारण असे दोन प्रकारचे निधी निश्चित करण्यात आले. या निधीतून आरोग्य व शिक्षणावर खर्च करण्यास परवानगी देण्यात आली. त्यानुसार १९१७-१८ मध्ये कडी जिल्ह्यातील औषधालयावर १२,००० रु. व बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई साहेब प्रसूतिगृहासाठी ३०० रु. खर्च करण्यात आले. तसेच अमरेलीच्या अनाथालयास वार्षिक २,४५० रु. निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. धर्म खात्याच्या वतीने बडोदा व अमरेली जिल्ह्यातील काही मंदिरांमध्ये धर्मविषयक प्रबोधन करण्यासाठी धार्मिक उपदेशक नेमण्यात आले. हे धार्मिक उपदेशक बडोदा व अमरेली जिल्ह्यातील खेड्यांमध्ये सामाजिक व धार्मिक बाबींमध्ये समाजप्रबोधन करीत. धर्म खात्याची रचना, खात्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदाऱ्या आणि देण्यात आलेले अधिकार यांचा विचार करता सयाजीरावांनी या खात्याच्या माध्यमातून प्रशासकीय पातळीवर धर्मसुधारणेचा प्रयोग यशस्वी केला. स्वतंत्र धर्मखाते स्थापन करून समाजात धर्मपरिवर्तन घडवून आणणारे सयाजीराव हे आधुनिक इतिहासातील पहिले प्रशासक ठरतात.

## प्राच्यविद्या संस्था

महाराजांच्या धर्म साक्षरतेच्या उपक्रमात प्राच्यविद्येचा समावेश होता. भारतीय संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने प्राचीन ग्रंथांच्या हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह, संरक्षण आणि संपादन करण्याचे महत्त्व सयाजीरावांनी जाणले होते. त्यामुळेच १८८७ च्या पहिल्या युरोप दौऱ्यात सयाजीरावांनी दुर्मिळ संस्कृत हस्तलिखिते जमा करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. सयाजीरावांच्या सूचनेप्रमाणे सर्वप्रथम १८९३ मध्ये बडोद्यातील विठ्ठल मंदिरातील संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह करण्यात आला. सुरुवातीला या संस्कृत हस्तलिखितांचे संवर्धन बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररीत करण्यात आले. यामध्ये महाराजांचे बंधू संपतराव गायकवाड यांच्या ६३० छापील वैयक्तिक ग्रंथसंग्रहाची भर पडली. पुढे यज्ञेश्वर शास्त्री यांच्या ४४६ हस्तलिखितांसह छापील ग्रंथ, महाराणी चिमणाबाई यांच्याकडून राजवाड्यातील ५ चित्रांची धातुपट्टी या संग्रहास भेट मिळाली. १८९३ मध्येच सयाजीरावांनी संस्कृत ग्रंथांचे प्रमुख केंद्र असलेल्या पाटण येथे लहान स्वरूपातील प्राच्यविद्या संस्थेची सुरुवात केली होती. त्यानंतर सयाजीरावांनी भारताच्या विविध प्रांतात फिरून हस्तलिखितांचे संकलन, अध्ययन व अनुवादाची जबाबदारी मणिभाई, नभुभाई द्विवेदी, अनंतकृष्ण शास्त्री यांच्यावर सोपविली. सयाजीरावांच्या आज्ञेनुसार संपूर्ण भारतात सात वर्षे भ्रमंती करून अनंतकृष्ण शास्त्री यांनी १०,०००

हस्तलिखिते जमा केली. या कामाला संस्थात्मक स्वरूप देण्यासाठी सयाजीरावांनी १९२७ ला बडोद्यात प्राच्यविद्या संस्थेची स्थापना केली. १९३३ पर्यंत १३,९८४ प्राचीन दुर्मिळ हस्तलिखितांचा संग्रह बडोदा प्राच्यविद्या संस्थेकडे उपलब्ध झाला. हा संग्रह भारतातील सर्वोत्तम संग्रहांपैकी एक मानला जातो.

प्राच्यविद्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी १९१५ मध्ये 'गायकवाड ओरिएंटल सिरीज' ही संशोधन प्रकाशन माला सुरू केली. १९१६ मध्ये राजशेखरकृत 'काव्यमीमांसा' हा या मालिकेतील पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. पाश्चात्त्य संशोधन पद्धती आणि प्रकाशन संहितेनुसार हस्तलिखितांच्या संशोधित आवृत्त्या 'गायकवाड ओरिएंटल सिरीज' प्रकाशित करू लागली. बडोदा प्राच्यविद्या संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या या गायकवाड ओरिएंटल सिरीजचा आंतरराष्ट्रीय दबदबा एवढा होता की, महाराज एकदा लंडनच्या इंडिया ऑफिस ग्रंथालयात गेले असता या सिरीजचे प्रणेते म्हणून त्यांना प्रथम प्रवेश देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ही घटना म्हणजे 'गायकवाड ओरिएंटल सिरीज'ला मिळालेल्या जागतिक मान्यतेचा पुरावाच आहे. दुर्दैवाने जागतिक मान्यता पावलेल्या या सिरीजचे नावदेखील आजच्या संशोधकांना माहीत नाही, ही आपली सर्वांत मोठी शोकांतिका आहे.

१९१७ मध्ये पुणे येथे स्थापन झालेल्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे संकल्पक डॉ. श्रीपाद बेलवलकर या संस्थेच्या स्थापनेसंदर्भात १९१६ मध्ये बडोद्यात सयाजीरावांना भेटले होते; परंतु अशा प्रकारची संस्था बडोद्यात स्थापन करण्याची योजना महाराजांनी त्याआधीच आखली होती. तरीदेखील सयाजीरावांनी बेलवलकर यांना पूर्णपणे निराश न करता भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या स्थापनेसाठी १००० रु. ची आर्थिक मदत देऊ केली. १९१६ पासून पुढे १९४० पर्यंत एकूण २४ वर्षे वर्षाला पाचशे रुपये वर्षासन असे एकूण १२,००० रु. चे आर्थिक साहाय्य महाराजांकडून करण्यात आले. १९२२ मध्ये या संस्थेला महाराजांनी महाभारतावरील संशोधनासाठी ५,५०० रुपये दिले. भांडारकर प्राच्यविद्या संस्थेला सयाजीरावांनी आपल्या कारकिर्दीत एकूण १८,५०० रुपये आर्थिक साहाय्य केले होते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४ कोटी ५८ लाख ६२ हजार रुपये इतकी होते; परंतु संस्थेच्या उभारणीत पायाभूत योगदान असणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेत संस्थेचे आश्रयदाते म्हणून सयाजीरावांचा फोटोसुद्धा येथे आपल्याला आढळत नाही याचे नवल वाटते.

## बडोद्यातील पुरातत्त्व विभाग

बडोदा संस्थानातील महत्त्वाच्या स्मारकांचे संवर्धन करण्याच्या भूमिकेतून सयाजीरावांनी १८८८ मध्ये प्रयत्न सुरू केले. त्यादृष्टीने भारताच्या पुरातत्त्व खात्यातील उच्चपदस्थ अधिकारी डॉ.

बर्जेस आणि कझन यांच्या नेतृत्वाखाली संस्थानचे सर्वेक्षण करून घेतले. त्या सर्वेक्षणाच्या आधारे संस्थानातील महत्त्वाच्या स्मारकांचे वैशिष्ट्य सांगणारे दोन ग्रंथ तयार केले. हे दोन ग्रंथ बडोदा संस्थानच्या सहकार्याने प्रकाशित करण्यात आले. त्यापैकी त्यांनी १८८८ मध्ये 'The Antiquities of Dabhoi' तर १९०३ मध्ये 'The Architectural Antiquities of North Gujarat' हा ग्रंथ प्रकाशित केला. संस्थानातील स्मारकांच्या संवर्धनाच्या हेतूने सल्ला घेण्यासाठी भारतीय पुरातत्व खात्यातील इतर अधिकाऱ्यांना वेळोवेळी संस्थानात निमंत्रित करण्यात येत होते. १९३३ साली बडोद्यात अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद आयोजित केली होती. या परिषदेत पुरातत्त्व खात्याची गरज ओळखून बडोदा संस्थानासाठी स्वतंत्र पुरातत्त्व विभागाची स्थापना करण्याचा ठराव करण्यात आला. पुढच्याच वर्षी म्हणजे १९३४ मध्ये बडोद्यात पुरातत्त्व विभागाची स्थापना करण्यात आली. या पुरातत्त्व खात्याच्या कामकाजाचे मुख्यत: तीन टप्प्यात वर्गीकरण केले आहे. पहिला टप्पा म्हणजे स्मारकांचे संवर्धन किंवा दुरुस्ती करणे, दुसरा टप्पा म्हणजे स्मारकांसंदर्भात संशोधन करणे. तर तिसरा टप्पा हा या स्मारकांची यादी करणे व इतर माहितीची नोंद ठेवणे हा होता.

स्मारकांचे संवर्धन करत असताना गुजरातच्या उत्तरेकडील ठिकाणांचा समावेश केला होता. यामध्ये मोठेरा येथील सूर्यमंदिर, दाभोई येथील हिरा गेट आणि बडोदा गेट, बडोदा

येथील राम आणि लक्ष्मणाचे मंदिर, द्वारका येथील वसईजवळील जुनागढ मंदिर, पिलूद्र येथील सीतलमाता मंदिर आणि पाटण येथील राणीवाव यांची निवड केली होती. यातील मोठेरा येथील सूर्यमंदिर संस्थानातील महत्त्वाच्या स्थापत्य रत्नांपैकी एक आहे.

पुरातत्त्वीय उत्खननासाठी चार जागा निवडण्यात आल्या. यामध्ये काठियावाडमधील अमरेली आणि मूल-द्वारका, दक्षिण गुजरातमधील कामरेज आणि उत्तर गुजरातमधील पाटण यांचा समावेश होता. कामरेज येथे ख्रिस्तपूर्व काळातील कर्षपणास नाणी सापडली. तसेच अज्ञात चिन्हे असणारी उज्जैन वा अवंती क्षेत्राची नाणीदेखील सापडली. अमरेली येथील उत्खननात गुप्त कालखंडातील २०० नाण्यांबरोबरच विविध प्राचीन कालखंडातील आश्चर्यकारक वस्तू आढळून आल्या.

मूल-द्वारका हे बडोदा संस्थानातील काठियावाडच्या पश्चिमेचे छोटेसे बंदर होते. महाभारतातील जुने द्वारावती म्हणजे हेच ठिकाण असल्याचे मानले जाते. या ठिकाणच्या उत्खननात मोठ्या दगडांनी बांधलेल्या मध्ययुगीन कालखंडातील भिंतींचे अवशेष सापडले. या भिंतींचे काही अवशेष समुद्रातदेखील सापडले. याचबरोबर उत्तर गुजरातमधील पाटण येथील सिद्धराज राजाच्या काळात बांधलेल्या जुन्या सहस्रलिंग तलावाचे परीक्षण करण्यात आले. या ठिकाणच्या उत्खननात कालव्यातील पाणी पातळीचे नियंत्रण करणारी अद्भुत यंत्रणा, पाण्याचे कालवे, गाळाचे खड्डे व दरीवरून पाणी वाहून नेणाऱ्या पुलाचे अवशेष सापडले. यामुळे या ठिकाणचे पुरातत्त्वशाखीय महत्त्व अनन्यसाधारण आहे.

मेहसाणा जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील १००० हून अधिक स्मारकांचे परीक्षण करून त्यांची यादी बनवण्याचे काम या खात्याकडून पूर्ण करण्यात आले. मोधेरा आणि रुद्र महालय मंदिरांबरोबरच खेरालू तालुक्यातील इतर स्मारकांची नोंद करून विस्तृत माहिती देण्यात आली. या सर्वेक्षणादरम्यान विभागाला सुमारे २०० शिलालेख मिळाले. इसवी सन दुसऱ्या शतकातील क्षत्रप राजा रुद्रसेन पहिला याच्या काळातील दफनविषयक शिलालेख हा या उत्खननात सापडलेला सर्वांत जुना शिलालेख आहे. शिलाहार राजा अपराजितच्या कारकिर्दीतील इ. स. ९१५ चे दोन अप्रकाशित तांब्यावरील लेख देखील यात समाविष्ट आहेत. पुरातत्त्व विभागातर्फे १९४१ पर्यंत या पुरातत्त्व विभागाची तीन विभागीय संस्मरणे 'Gaekwad's Archaeological Series' मध्ये प्रकाशित करण्यात आली. या तीन संस्मरणिकांपैकी एक 'Indian Pictorial Arts as Developed in Book Illustration' ही आहे. दुसरे पुस्तक 'Asokan Rock at Girnar' हे आहे. हे पुस्तक अशोकावरील विविध महत्त्वाच्या नोंदी जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे आहे. याचबरोबर मौर्य सम्राट रुद्रदामन, महाक्षत्रप व स्कंधगुप्त, गुप्त सम्राट यांच्या संदर्भात गिरनार येथे कोरलेल्या शिलालेखांच्या माहितीचाही यात समावेश आहे. 'Ruins of Dabhoi or Ancient Darbhavati' या तिसऱ्या पुस्तकात दाभोई येथील पुरातत्त्व वास्तूंचे वर्णनात्मक व ऐतिहासिक महत्त्व विशद केले आहे. पुरातत्त्व विभागाने

राबविलेल्या विविध उपक्रमांवर आधारित १९३४-३५,१९३५-३६,१९३६-३७, १९३७-३८ व १९३८-३९ या पाच वर्षांचे वार्षिक अहवालदेखील पुरातत्त्व विभागाने प्रकाशित केले. अभ्यासकांना व सर्वसामान्य लोकांना या अहवालांचा उपयोग व्हावा हा यामागील उद्देश होता.

संस्थानातील प्राच्यविद्या संस्था आणि पुरातत्त्व विभाग हा धर्म खात्याच्या अधिकार क्षेत्रात येत होता. महाराजांच्या धर्म साक्षरतेच्या सर्व प्रयत्नांना आधारभूत असे काम या दोन संस्थांच्यामार्फत झाले आहे. कारण आपल्या अज्ञात इतिहासाची महत्त्वाची साधने या दोनच मार्गांनी उपलब्ध होऊ शकतात. आपला प्राचीन इतिहास हजारो वर्षांपूर्वीचे धर्मग्रंथ आणि पृथ्वीच्या पोटात गाडली गेलेली आपली संस्कृती यांच्या आधारेच शोधावा लागतो. महाराजांनी १२८ वर्षांपूर्वी यादृष्टीने केलेले काम त्यांच्या द्रष्ट्या इतिहासाभ्यासाची साक्ष आहे.

## सयाजीरावांचे पथदर्शक धर्मविषयक कायदे

सयाजीरावांनी १९०१ मध्ये बडोदा संस्थानात धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा अमलात आणला. १८८३ मधील राजवाड्यातील खासगी खंडेरायाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करणे वा १८९० मध्ये बांधकाम पूर्ण झालेल्या लक्ष्मीविलास राजवाड्याच्या शिखरावर हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन यांसह ७ धर्मांची तत्त्वे कोरणे या सर्व बाबी सयाजीरावांच्या विचारातील सर्व धर्मांप्रतिची आदराची भावना अधोरेखित करतात. १९०१

मध्ये बडोद्यात त्यांनी लागू केलेला धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा या पार्श्वभूमीवर विचारात घ्यावा लागतो. संस्थानातील जनतेला कोणत्याही धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य कायद्याच्या माध्यमातून प्रदान करण्यापूर्वी जनतेमध्ये सर्व धर्मांबद्दल 'समताभाव' रुजवण्याचा प्रयत्न सयाजीरावांनी सातत्याने केला. बडोदा कॉलेजमध्ये सुरू करण्यात आलेले तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन हा या प्रयत्नांचाच भाग होता.

ब्रिटिश कायद्याप्रमाणेच धर्मांतराने अथवा जातीबहिष्काराने व्यक्तीच्या अर्जित हक्कांवर कोणत्याही प्रकारची गदा येणार नाही याची काळजी धार्मिक स्वातंत्र्याच्या कायद्यात घेण्यात आली. धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीने नोंदणी कामदाराला पूर्वसूचना देणे बंधनकारक करण्यात आले. तसेच धर्मांतर करू इच्छिणारी व्यक्ती काही काळ बडोद्याची रहिवासी असणे आवश्यक होते. जबरदस्तीने कोणत्याही व्यक्तीचे धर्मांतर होऊ नये यासाठी कायद्यात या तरतुदी करण्यात आल्या होत्या. आज आपल्या सभोवताली स्वधर्मश्रेष्ठता व परधर्माविषयीच्या आकसातून जबरदस्तीने होणारी धर्मांतरे विचारात घेतली तर १९०१ च्या कायद्यातील या तरतुदींचे 'चिरकालिनत्व' लक्षात येते.

सयाजीरावांनी धार्मिक सुधारणा करताना हिंदू धर्मांबरोबरच १९०१ मध्ये ९ टक्के असलेल्या मुस्लिमधर्मीयांसाठी 'वक्फ कायदा' केला. मुस्लिम धर्मीयांमध्ये दानधर्मासाठी दिलेल्या देणगीला 'वक्फ' असे म्हणतात. अशा देणगीची व्यवस्था

करण्यासाठी नेमलेल्या व्यवस्थापकाला ‘मुतवल्ली’ (विश्वस्त) असे म्हणतात. धर्मादाय मिळकतीची व्यवस्था मूळ उद्देशाला धरून करण्याची व जमा खर्चाचे हिशेब बरोबर ठेवण्याची जबाबदारी मुतवल्लींवर होती; परंतु मुतवल्ली म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती ती धर्मादाय मिळकत आपल्या मालकीचीच आहे असे समजून तिचा वैयक्तिक फायद्यासाठी उपयोग करत असत. याशिवाय अशा मिळकतीची कोठेही नोंद नसल्यामुळे कोणती मिळकत धर्मादाय म्हणून दिली आहे हे समजणेही कठीण होत असे. ही दुर्व्यवस्था दुरुस्त करून मुस्लिम देवस्थानांना व मुतवल्लींना शिस्त लावण्याच्या उद्देशाने १९२७ मध्ये वक्फ कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे मुतवल्लींकडून धर्माच्या नावाखाली होणाऱ्या चुकीच्या आचरणाला शिस्त लावण्याचा प्रयत्न महाराजांनी केला.

संस्थानातील देवास्थानांपैकी ज्या मंदिरांना सरकारी मदत मिळत होती त्यांना सार्वजनिक देवस्थाने म्हटले जात असे, तर ज्या मंदिरांना सरकारकडून अत्यल्प मदत मिळत असे त्यांना खासगी देवस्थाने म्हणत. खासगी देवस्थानांपैकी कित्येक मंदिरे ही पैशासाठी घरातच मूर्तीची स्थापना करून त्याला मंदिरांचे नाव दिले जात असे. या दोन्ही प्रकारच्या देवस्थानातील उत्पन्नाचा व खर्चाचा हिशोब ठेवला जात नव्हता. त्यामुळे झालेला खर्च कोणत्या कारणासाठी केला, तो किती केला, एकूण रकमेपैकी किती रक्कम मूळ उद्देशावर खर्च केली याबद्दलची माहिती

मिळणे कठीण होई. त्यामुळे अशा संस्थांचे नियमन करण्यासाठी महाराजांनी १९०५ मध्ये 'सार्वजनिक संस्था (दानधर्म) संबंधीचा कायदा' केला.

या कायद्याच्या माध्यमातून वतनांपैकी जितका भाग मूळ उद्देशाला धरून खर्च करण्यात येत होता तेवढाच भाग कायम ठेवला आणि बाकीचा कमी करण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर सर्व देवस्थानांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार बारखळी खात्याकडे देऊन वर्षाच्या सुरुवातीस त्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक करून ते या खात्याने मंजूर करावे असा नियमही केला व त्याप्रमाणे खर्च होत आहे का हे तपासण्याची जबाबदारी त्या खात्याकडे सोपवण्यात आली. तसेच २०० रु. पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या संस्थांनी आपल्या खर्चाचे अंदाजपत्रक देवस्थान विभागाकडे सादर करणे अनिवार्य केले.

सयाजीरावांनी १९०८ मध्ये आंतरधर्मीय-आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणारा विशेष विवाह कायदा केला. ब्रिटिश भारतातील विवाह नोंदणी कायद्यानुसार आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ते कोणत्याही धर्माचे अनुयायी नसल्याचे लिहून देणे बंधनकारक होते. बडोद्यातील विशेष विवाह कायद्यातून ही अट काढून टाकण्यात आली. या कायद्याद्वारे आंतरधर्मीय-आंतरजातीय विवाह करू इच्छिणाऱ्या जोडप्यांना आपल्या इच्छेनुसार धर्माचरण करण्याची मुभा मिळाली. अशा प्रकारचा संपूर्ण भारतातील हा पहिला कायदा होता. १९०१ मध्ये

बडोद्यातील जनतेला धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क प्रदान करण्यात आला होता. त्याचा पुढील टप्पा १९०८ मधील विशेष विवाह कायद्याद्वारे गाठण्यात आला. धर्मनिरपेक्ष भारतात स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतरही या कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीचा विचार करता येत नाही हीच या कायद्याची क्रांतिकारकता आहे.

कोणताही बदल समाजात रुजवत असताना कायद्याच्या अथवा सत्तेच्या अधिकाराच्या जोरावर त्याची अंमलबजावणी न करता समाजात तो बदल मुळापासून 'रुजवण्यावर' सयाजीरावांनी भर दिला. १९१५ मध्ये लागू करण्यात आलेला पुरोहित कायदा हे त्याचे उत्तम उदाहरण मानता येईल. पौरोहित्य करणाऱ्या व्यक्तीला त्या विधींचे योग्य धार्मिक ज्ञान आहे की नाही याची परीक्षा घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या व्यक्तीलाच धर्मविधी करण्याचा अधिकार या कायद्यांतर्गत प्राप्त होत होता. हिंदू धर्मातील सर्व जातीच्या व्यक्तींना ही परीक्षा उत्तीर्ण होऊन पौरोहित्य करण्याचा अधिकार या कायद्याने दिला. पौरोहित्य प्रमाणपत्रासाठी बंधनकारक परीक्षेची सुरुवातीला असणारी ५ वर्षांची वैधता नंतरच्या काळात ३ वर्षे आणि शेवटी १ वर्षावर आणण्यात आली. त्यामुळे पुरोहित वर्गाला स्वत:चे धर्मविषयक ज्ञान दरवर्षी अद्ययावत करणे अत्यावश्यक बनले. पुरोहितांच्या धार्मिक ज्ञानाची परीक्षा घेणारे सयाजीराव हे जगातील पहिले प्रशासक ठरावेत. सयाजीरावांनी हा कायदा प्रथम बडोदा जिल्ह्यापुरता लागू केला. कायद्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या

अडचणी दूर करून व जनतेच्या मानसिक तयारीसाठी १८ वर्षांचा कालावधी देऊन अखेर १९३३ मध्ये संपूर्ण बडोदा संस्थानात हिंदू पुरोहित कायदा लागू करण्यात आला.

पुण्यप्राप्तीसाठी संन्यास दीक्षा स्वीकारण्याच्या जैन धर्मातील गैरसमजुतीचा लहान मुलांबाबत दुरुपयोग करून त्यांना जबरदस्तीने दीक्षा देण्याचे प्रकार बडोद्यातील जैनधर्मीयांत सातत्याने घडत. या वाढत्या गैरप्रकारांबद्दल जैनधर्मीयांकडून करण्यात आलेल्या तक्रारीनुसार लहान मुलांना दीक्षा देण्याबाबत जैन धर्मग्रंथांमधील आधार शोधण्यासाठी सयाजीरावांनी एका समितीची स्थापना केली. या समितीने असा कोणताही धर्मग्रंथातील आधार सापडत नसल्याचा अहवाल दिल्यानंतर जैन धर्मातील अन्यायी संन्यास दीक्षा पद्धत बंद करण्यासाठी १९३३ मध्ये बडोद्यात संन्यास दीक्षा प्रतिबंधक कायदा संमत करण्यात आला.

या कायद्याची निर्मिती प्रक्रिया सयाजीरावांची धार्मिक सुधारणांबाबतची सर्वसमावेशक भूमिका स्पष्ट करते. या कायद्यानुसार लहान मुलांना संन्यास दीक्षा देणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे १९४१ पर्यंत एकाही अल्पवयीन जैन मुलाला संन्यास दीक्षा देण्याचा प्रकार समोर आला नाही. कायदा निर्मिती प्रक्रियेदरम्यान समाजघटकांचा मिळवलेला पाठिंबा आणि कायद्याची कडक अंमलबजावणी याचा हा परिणाम होता. स्वतंत्र भारताच्या

संसदेत संन्यास दीक्षा प्रतिबंधक बिल संमत करण्याचे १९५७ व १९५९ मध्ये दोन वेळा प्रयत्न करण्यात आले. परंतु दोन्ही वेळेला भारतीय संसदेला आलेले अपयश कायदा निर्मिती आणि अंमलबजावणीच्या क्षेत्रातील सयाजीरावांचे 'अनन्यत्व' सिद्ध करते.

## बडोद्याचे हिंदू कोड बिल

भारतीय महिलांच्या उत्कर्षाचा मार्ग असणाऱ्या परंतु त्यासाठी महिलांबरोबरच स्वत: बाबासाहेबांनाही संघर्ष कराव्या लागलेल्या हिंदू कोड बिलातील सर्व ६ कायदे सयाजीरावांनी १९०५ ते १९३३ दरम्यान बडोद्यात लागू केले होते. भारतीय राज्यघटनेत या विषयाची चर्चा सुरू होण्याअगोदर ४५ वर्षे बडोद्यात हिंदू कोड बिलाची अंमलबजावणी सुरू झाली होती, तर उर्वरित भारतातील हिंदू महिलांना जे हक्क मिळायला ६०-७० वर्षे संघर्ष करावा लागला ते हक्क बडोद्यातील स्त्रियांना उर्वरित भारतातील हिंदू स्त्रियांच्या अगोदर ११५ वर्षे मिळाले होते. बडोद्याच्या या हिंदू कोड बिलाचे १) विवाह २) दत्तक ३) पालक आणि मुले ४) वारसा हक्क ५) कौटुंबिक संबंध ६) कौटुंबिक संपत्ती असे ६ घटक होते.

बडोद्याच्या हिंदू कोड बिलातील पहिला कायदा हिंदू विवाह कायद्याच्या रूपाने १९०५ मध्ये लागू झाला. या कायद्यात हिंदू लग्नाच्या मूलतत्त्वांची व्याख्या करून, कायदेशीर लग्नाच्या अवश्य गोष्टी, स्त्री-पुरुषांचे परस्पर हक्क, त्यांचे मिळकतीवरील

अधिकार, एकमेकांबद्दलची जबाबदारी व लग्नसंबंधाची अविछिन्नता या सर्व गोष्टी निश्चित करण्यात आल्या. हिंदू विवाह कायदा करणारे बडोदा हे ब्रिटिश भारत आणि ५६५ संस्थानातील पहिले संस्थान होते. या कायद्यात १९२८ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार लग्न विधीच्या वेळी जे वैदिक मंत्र म्हटले जातात त्यांचा अर्थ पुरोहिताने वधू-वरांना त्यांच्या मातृभाषेत सांगणे बंधनकारक केले. तसे न केल्यास त्याला ५०रु. दंड करण्याची तरतूद केली. अशा प्रकारची तरतूद असणारा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतात आजअखेर एकही कायदा अस्तित्वात आला नाही.

हिंदू परंपरेनुसार वधूच्या पित्याचे गोत्र व प्रवर हे पतीच्या गोत्र प्रवराहून भिन्न असणे गरजेचे होते. १९३२ मध्ये या कायद्यात केलेल्या दुरुस्तीनुसार हे निर्बंध काढून सगोत्र विवाहास कायदेशीर मान्यता देण्यात आली. १४ वर्षांनंतर १९४६ मध्ये ब्रिटिश भारतात लागू करण्यात आलेल्या Hindu Marriage Disabilities Removal Act मध्ये समान गोत्र व प्रवराच्या व्यक्तींच्या विवाहाला परवानगी देण्यात आली. स्वतंत्र भारतात १९५५ मध्ये Hindu Marriage Act संमत करण्यात आला. या कायद्यात विवाहासाठीचे विधी आणि पद्धती निश्चित करण्यात आल्या. त्याआधी ५० वर्षे १९०५ च्या हिंदू विवाह कायद्यात सयाजीरावांनी हिंदू लग्नाच्या मूलतत्त्वांची व्याख्या करतानाच लग्न करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे परस्परसंबंधातील हक्कदेखील निश्चित केले होते.

हिंदू कोड बिलासंदर्भातील दुसरा महत्त्वाचा 'हिंदू दत्तक नोंदणी कायदा' सयाजीरावांनी १९१० मध्ये बडोद्यात लागू केला. हिंदू धर्म परंपरेनुसार कोणत्याही व्यक्तीला केवळ त्याच्या रक्तसंबंधातील व्यक्तीलाच दत्तक घेता येत होते. तसेच प्रत्येक व्यक्तीला दत्तकप्रसंगी दत्तक होम विधी करणे बंधनकारक होते. १९१० च्या या कायद्यानुसार दत्तक होम विधीची प्रथा संपुष्टात आणताना ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या सर्वांसाठी दत्तक होम विधी अनावश्यक ठरवण्यात आला. १९२७ मध्ये या कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार इतर सामान्य कायद्यांचे निर्बंध पाळून कोणताही सजातीय मुलगा दत्तक घेण्यास परवानगी देण्यात आली. पुढे १९२९ मध्ये बॅ.जयकर यांनी अशाच स्वरूपाची सुधारणा ब्रिटिश भारतातील कायद्यात सुचवणारे बिल मुंबई कायदे मंडळात आणले; परंतु ते मंजूर झाले नाही. लोकांची धर्म साक्षरता वाढवण्याच्या दृष्टीने दत्तक विधीबाबत माहिती देणारा 'दत्तकचंद्रिका' या ग्रंथाचा सुरतकर यांनी केलेला मराठी अनुवाद महाराजांनी प्रसिद्ध केला होता.

१९३१ साली बडोद्यात हिंदू घटस्फोट कायदा अमलात आला. कोर्टात नोंदणी केल्याशिवाय घटस्फोट मान्य केला जाणार नाही अशी या कायद्यात तरतूद होती. या कायद्यानुसार कोणत्याही स्त्रीच्या पतीचा मृत्यू होऊन ७ वर्षे झाली असतील, त्याने संन्यास घेतला असेल, धर्मांतर केले असेल किंवा तो नपुंसक असेल तर त्या स्त्रीला अशा लग्नातून घटस्फोट मागण्याचा अधिकार होता.

याचबरोबर जर पत्नी लग्नाच्या वेळी इतर पुरुषाकडून गरोदर असल्याचे लग्नानंतर पतीला आढळून आल्यास किंवा पत्नीने दुसरा पती केला असेल, तर त्या पुरुषाला आपल्या पत्नीविरुद्ध घटस्फोट मागण्याचा अधिकार होता. या मुख्य कलमांबरोबरच पत्नीच्या व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाह आणि संगोपनाची व्यवस्था करण्याबद्दलचे नियमही या कायद्यात करण्यात आले होते.

वारसा हक्काने हिंदू महिलांना संपत्तीत हिस्सा देणारा 'हिंदू स्त्रियांचा संपत्तीतील हक्क कायदा' १९३३ साली महाराजांनी बडोद्यात लागू केला. असा कायदा करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते. मृत मुलींच्या मुलांना जिवंत मुलींबरोबर संपत्तीत वाटा देण्याची सयाजीरावांनी या कायद्यात केलेली तरतूद स्वतंत्र भारतात ७० वर्षांनंतरदेखील लागू होऊ शकली नाही यातून सयाजीरावांच्या या कायद्याचे क्रांतिकारकत्व सिद्ध होते. ब्रिटिश भारतात 'द हिंदू वुमेन्स राईट टू प्रॉपटी ॲक्ट' हा कायदा १९३७ मध्ये म्हणजेच बडोद्यानंतर ४ वर्षांनी पास झाला. तर स्वतंत्र भारतात १९५६ मध्ये 'हिंदू सक्सेशन ॲक्ट' लागू झाला. या कायद्यातील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास केल्यास १९३३ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात लागू केलेला हा कायदा अधिक प्रगत व परिणामकारक असल्याचे स्पष्ट होते.

१८ मार्च १९६३ रोजी दैनिक मराठामध्ये महाराजांच्या जन्मशताब्दी निमित्त लिहिलेल्या अग्रलेखात प्र. के. अत्रे म्हणतात, "१९०५ साली महाराजांनी 'हिंदू कायदा' कोडाच्या स्वरूपात प्रसिद्ध करून जे ब्रिटिशांना हिंदुस्थानात शक्य झाले नाही, एवढेच नव्हे तर आता काँग्रेसच्या राज्यात कायदेमंत्री डॉ. आंबेडकरांनाही करता आले नाही, ते त्यांनी करून दाखवले." अत्रेंचे हे विश्लेषण आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीने स्वत:च्या परिपूर्ण प्रबोधनासाठी तातडीने समजून घेणे गरजेचे आहे.

## सयाजीराव : जागतिक सर्वधर्म परिषदेचे एकमेव भारतीय अध्यक्ष

१८९३ ला शिकागो येथे झालेल्या पहिल्या जागतिक सर्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी ऐनवेळी केलेले भाषण हा भारतीयांच्या गौरवाचा आणि कौतुकाचा विषय आहे. परंतु १९३३ मध्ये शिकागो येथेच झालेल्या दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्ष महाराजा सयाजीराव होते हा इतिहास सामान्य भारतीय सोडाच धर्मशास्त्राच्या अभ्यासकांनासुद्धा माहीत नसावा ही बाब भारतासाठी नक्कीच कमीपणाची आहे. ज्याप्रमाणे विवेकानंदांचे भाषण गाजले होते त्याचप्रमाणे सयाजीरावांच्या भाषणाची चर्चा त्यावेळी अमेरिकेतील वृत्तपत्रांबरोबरच विद्वानांनीही केली होती. विशेष म्हणजे अध्यक्षपद महाराजांना वारंवार विनंती करून देण्यात आले होते. यावरून धर्मशास्त्राच्या अभ्यासातील महाराजांची जागतिक मान्यता स्पष्टपणे अधोरेखित होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारतातील आज अखेरचे सर्वांत पुरोगामी राज्यकर्ते आहेत असे विधान आपण प्रस्तावनेच्या सुरुवातीलाच केले होते. वरील विश्लेषणावरून त्या विधानाची पूर्ण प्रचिती आपल्याला नक्की येईल. परंतु दुर्दैवाने भारतीय प्रबोधन परंपरेने आणि मुख्यतः महाराष्ट्राच्या पुरोगामी भूमीने आपल्या या महान भूमिपुत्राकडे पूर्ण दुर्लक्ष करून आपल्या पुरोगामी परंपरेची एकप्रकारे विटंबनाच केली आहे. फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा या तीन महापुरुषांनी धर्मसत्तेविरुद्ध केलेल्या बंडाचा त्याला संदर्भ असतो. आपल्याकडे शाहू महाराजांच्या वेदोक्ताच्या अनुषंगाने एका राजाने केलेला संघर्ष धगधगत्या निखाऱ्यासारखा आजही चर्चेत असतो. शाहू महाराजांनी धर्मसत्तेला पर्याय म्हणून मराठा छात्रजगद्गुरूपीठ स्थापन केले; परंतु वेदोक्त असो की छात्रजगद्गुरूपीठ आज आपण जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा या प्रयत्नांच्या मर्यादा स्पष्ट होतात. त्या पार्श्वभूमीवर शाहुंचे समकालीन असणाऱ्या महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या धर्मसुधारणा आणि मुख्यतः धर्म खाते आणि हिंदू पुरोहित कायदा हे प्रयत्न आजसुद्धा प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरतात. सयाजीरावांच्या या सर्व कामामुळे ते भारताच्या सीमा ओलांडून जागतिक धर्म प्रबोधन परंपरेतसुद्धा पथदर्शक ठरतात.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com